महाराष्ट्र शासन

क्र - बीसीसी -२०१८/प्र.क्र.६३१ A/१६-ब
सामान्य प्रशासन विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक: ०४.०७.२०१९

प्रति,

मा.सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

विषय- पदभरती २०१८-२०१९.
संदर्भ - सामान्य प्रशासन विभागाचे समक्रमांकाचे दि.३१.१२.२०१८ व दि.२५.०२.२०१९ रोजीचे पत्र कृपया पहावे.

महोदय/महोदया,

सन २०१८ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र,६२ दि.३०.११.२०१८ अन्वये सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागास (एस.ई.बी.सी.) वर्गाकरीता १६ % आरक्षण देण्यात आले आहे. त्याविरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र.१७५/२०१८ व इतर याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. तसेच सदर याचिकांमधील मा.उच्च न्यायालयाचे आदेश व प्रकरणे न्यायप्रविष्ट असल्याने एसईबीसी आरक्षणासह देण्यात आलेल्या जाहिरातींमधील भरती संबंधाने नियुक्ती आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही मा.उच्च न्यायालयातील संबंधित प्रकरणातील पुढील आदेश होईपर्यंत करण्यात येऊ नये अशा सूचना संदर्भाधीन पत्रान्वये देण्यात आल्या होत्या.

२. सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दि.२७.०६.२०१९ रोजी अंतिम निकाल दिलेला आहे. त्यानुसार मा.न्यायालयाने राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरीता १६% ऐवजी १२% व राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांकरीता १६% ऐवजी १३% आरक्षण ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत. सबब संबंधित सर्व विभागांनी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने व शासनाने आरक्षण अधिनियम २०१८ (२०१८ चा महा. ६२) मधील कलम ४ च्या पोट कलम (१) मध्ये (क) व (ख) येथे केलेल्या सुधारणा विचारात घेता, शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरीता १२% व राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांमध्ये १३% जागा एसईबीसी वर्गाकरीता ठेवण्याची कार्यवाही संबंधित विभागांनी तात्काळ पूर्ण करावी.

३. सरळसेवा भरतीसाठी सुधारित बिंदुनामावली स्वतंत्रपणे विहीत करण्यात येत आहे. प्रशासकीय विभागाने यापूर्वी १६% प्रमाणे पदभरती करण्यासाठी जाहीरात देऊन पदभरतीची प्रक्रिया सुरु केली असल्यास, आता जनहित याचिका क्र.१७५/२०१८ व इतर प्रकरणामधील मा. मुंबई उच्च न्यायालयाचे दि.२७.०६.२०१९ चे आदेश विचारात घेता सरळसेवा भरतीमध्ये १३% आरक्षणानुसार एसईबीसी प्रवर्गाकरीता आरक्षण निश्चिती करुन पद भरतीची कार्यवाही त्यांच्या स्तरावर पूर्ण करावी.

४. सदर सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अखत्यारीतील सर्व कार्यालयांना याबाबत त्वरीत कळवावे, अशी आपणास विनंती आहे.

५. सदर पत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०७०४१३१६०११८०७ असा आहे.

आपला विश्वासू,

Tikaram Waman Karpate

Digitally signed by Tikaram Waman Karpate
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c97a9d6b23c34fddbfe8f6f6189c08328de56af131faf7d6c0a149c3a4cf1436, serialNumber=9395c596b57a69fe04109b8c8191e7389cff5eda3fac16c6f8263be7fbbd319d, cn=Tikaram Waman Karpate
Date: 2019.07.04 13:21:10 +05'30'

(टि. वा. करपते)

उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत -

१) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, यांचे वरिष्ठ स्वीय सहायक

२) सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य.

३) सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य.

४) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.

५) सर्व सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष),महाराष्ट्र राज्य.